# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

**परिपत्रक क्र.१८९/२०१७**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीच्या राजपत्रान्वये विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठीच्या पात्रता शर्ती निश्चित केलेल्या आहेत. या पात्रता शर्ती ग्राह्यतेबाबतच्या धोरणाचा मसुदा, विविध अधिकार मंडळाची निवडणूक प्रक्रिया चालू असताना काही कायदेशीर/तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास, अशावेळी कार्यालयात त्वरित निर्णय घेण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी घटित करण्यात आलेल्या सुकाणू समितीने या पात्रता शर्ती ग्राह्यतेबाबतच्या धोरणाचा शिफारस केलेला मसुदा मा. व्यवस्थापन परिषदेने दिनांक ०३.०८.२०१७ रोजीच्या सभेत स्वीकारलेला आहे.

विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या पात्रता शर्तीच्या ग्राह्यतेबाबतचे नियम पुढीलप्रमाणे आहेत -

| अ. क्र. | विहित पात्रता शर्ती | ग्राह्य पुरावा / दस्तऐवज |
|---|---|---|
| १. | विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.<br>(महाविद्यालयीन अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, प्राचार्य, संचालक, महाविद्यालयीन / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख आणि विद्यापीठ विभागप्रमुख) | विद्यापीठ परीक्षेसाठी (लेखी व प्रात्यक्षिक) प्राश्निक, परीक्षक, पर्यवेक्षक किंवा परीक्षेच्या इतर नेमणूकांची कागदपत्रे तपासून त्या आधारे संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य/ मान्यता प्राप्त संस्थेचे संचालक / विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे विभागप्रमुख यांनी निर्गमित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. **(परिशिष्ट - १)**<br>उमेदवार जर प्राचार्य / संचालक असेल तर योग्य त्या पुराव्यांच्या आधारे विद्यापीठाच्या संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी निर्गमित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. **(परिशिष्ट - २)**<br>उमेदवार जर विद्यापीठ विभागप्रमुख असेल तर योग्य त्या पुराव्यांच्या आधारे विद्यापीठाच्या संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी निर्गमित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. **(परिशिष्ट - ३)** |
| २. | व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा / व्यवस्थापन समितीचा किमान दोन वर्षे सदस्य असावा. | संबंधित संस्थेचे अध्यक्ष / कार्यकारी अध्यक्ष / सचिव/कार्यकारी सचिव / सहसचिव यांनी निवडणूक निकाल / संस्थेच्या ठरावाच्या आधारे निर्गमित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.<br>उमेदवार स्वतः संस्थेचा सचिव असेल तर अध्यक्ष/कार्यकारी अध्यक्ष यांच्या सहीचे प्रमाणपत्र व उमेदवार स्वतः संस्थेचा अध्यक्ष असेल तर संस्थेच्या सचिव/कार्यकारी सचिव/ सहसचिव यांच्या सहीने निर्गमित केलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल. **(परिशिष्ट - ४)** |

| अ.क्र. | विहित पात्रता शर्ती | ग्राहय पुरावा / दस्तऐवज |
|---|---|---|
| ३. | अध्यापनाचा अनुभव<br><br>(महाविद्यालयीन अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, प्राचार्य, संचालक, महाविद्यालयीन / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख आणि विद्यापीठ विभागप्रमुख) | विद्यापीठ शिक्षक मान्यता पत्राच्या आधारे संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थेचे संचालक यांनी निर्गमित केलेले विहित नमुन्यातील अनुभव प्रमाणपत्र व त्या पुष्टयर्थ मान्यता पत्र / पत्रांच्या प्रती उमेदवारी अर्जासोबत जोडाव्या लागतील. **(परिशिष्ट - ५)**<br><br>उमेदवार हा स्वतः प्राचार्य / संचालक असेल तर संबंधित संस्थेच्या अध्यक्ष / कार्यकारी अध्यक्ष / सचिव / सहसचिव यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल. **(परिशिष्ट - ६)**<br><br>विद्यापीठ विभागातील शिक्षक व विभागप्रमुखांसाठी विद्यापीठाच्या प्रशासनाने निर्गमित केलेले विहित नमुन्यातील अनुभव प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल. **(परिशिष्ट - ७)** |
| ४. | मान्यताप्राप्त पीएच.डी. मार्गदर्शक, ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असेल.<br>(महाविद्यालयीन अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, प्राचार्य, संचालक, महाविद्यालयीन / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख आणि विद्यापीठ विभागप्रमुख) | विद्यापीठाने निर्गमित केलेले व वैध कालावधी समाप्त झाला नसेल अशा पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता पत्राची स्वयं साक्षांकित प्रत आणि संबंधितांच्या पर्यवेक्षणाखाली पीएच.डी. पदवी प्रदान केलेल्या विद्यार्थ्यांचे पीएच.डी. निकाल घोषणापत्र (Declaration of Result of Ph.D.) व पीएच.डी. पदवी प्रमाणपत्राच्या स्वयं साक्षांकित प्रती ग्राहय धरण्यात येतील.<br>**(विद्यापीठ विभागातील सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक यांना पीएच.डी. मार्गदर्शक मान्यता पत्राची प्रत सादर करण्याची आवश्यकता नाही.)** |
| ५. | पाठ्यपुस्तकांचा / संदर्भ पुस्तकांचा लेखक / सहलेखक असावा.<br>संदर्भ पुस्तक प्रसिध्द केलेले असावे.<br>(महाविद्यालयीन अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, प्राचार्य, महाविद्यालयीन/मान्यता प्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख आणि विद्यापीठ विभागप्रमुख) | संबंधित पुस्तकांच्या / संदर्भ पुस्तकांच्या ज्या पृष्ठावर संबंधितांच्या नावाचा लेखक / सहलेखक म्हणून स्पष्टपणे उल्लेख आहे त्या पानांच्या स्वयं साक्षांकित प्रती ग्राहय धरण्यात येतील. |
| ६. | मूळ लेखक / अनुरुप लेखक म्हणून तज्ज्ञ परिक्षित जर्नल्समध्ये शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत.<br>तज्ज्ञ परीक्षित राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत.<br>(महाविद्यालयीन अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, प्राचार्य, संचालक, महाविद्यालयीन / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख आणि विद्यापीठ विभागप्रमुख) | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर ugc.ac.in/research journal list या लिंकवर उपलब्ध असलेल्या यादीतील जर्नल्समध्ये मूळ लेखक / अनुरुप लेखक म्हणून उल्लेख असलेल्या लेखांच्या स्वयं साक्षांकित प्रती ग्राहय धरण्यात येतील. |

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.
जा.क्र. : साफुपुविनि/ ९६
दिनांक : १८ ऑगस्ट, २०१७

१८।८।१७
(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

**(टीपः ज्या मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरावयाचा आहे, त्याप्रमाणे वरील नियम लागू होतील.)**

**(परिशिष्ट - १)**

**महाविद्यालयीन, मान्यताप्राप्त परिसंस्थेतील व विद्यापीठ विभागातील अध्यापक/महाविद्यालयीन व मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुख यांचेकरिता.**

## विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाबाबतचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./डॉ. ...................................... हे पीएच.डी. पदवीधारक असून ............................... या विद्यापीठाच्या विभागात / संलग्न महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्थेत पूर्णवेळ विद्यापीठ मान्यताप्राप्त ........................... या पदावर दिनांक ............... पासून आजतागायत कार्यरत आहेत व त्यांचा सेवानिवृत्तीचा दिनांक ............ आहे. त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचा एकूण .......... वर्षांचा अनुभव आहे.

सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांच्या विनंती अर्ज व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीच्या कामी देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

ठिकाण : **प्राचार्य / संचालक / विद्यापीठ विभागप्रमुख**

दिनांक : **महाविद्यालय / परिसंस्था / विद्यापीठ विभागाचे नाव व शिक्का**

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांनी संलग्न महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्था / विद्यापीठ विभागाच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**

**(परिशिष्ट - २)**

**महाविद्यालयीन प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक यांचेकरिता**

## विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाबाबतचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./डॉ. ....................................... हे पीएच.डी. धारक असून ............................... या संलग्न महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य / संचालक या पदावर दिनांक ............... पासून आजतागायत कार्यरत आहेत. त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचा एकूण .......... वर्षांचा अनुभव आहे.

सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांच्या विनंती अर्ज व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीच्या कामी देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

ठिकाण :

**संचालक,**

दिनांक :

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे विद्यापीठाच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**

(परिशिष्ट - ३)

**विद्यापीठ विभागप्रमुख यांचेकरिता**

## विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाबाबतचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./डॉ. ....................................... हे पीएच.डी.धारक असून ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ............................... या विभागाचे प्रमुख या पदावर दिनांक ............... पासून आजतागायत कार्यरत आहेत. त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचा एकूण ......... वर्षांचा अनुभव आहे.

सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांच्या विनंती अर्ज व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीच्या कामी देण्यात येत आहे.

स्वाक्षरी

ठिकाण :

दिनांक :

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे विद्यापीठाच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**

(परिशिष्ट - ४)

## व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा / व्यवस्थापन समितीच्या कामकाजाबाबतचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./डॉ. ...................................... हे पदवीधर असून ................................ या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष / सचिव / नियामक मंडळ सदस्य म्हणून दिनांक ............... पासून आजतागायत कार्यरत आहेत व त्यांचा सदर पदावरील कार्यकाळ ................. या दिनांकापर्यंत आहे. शैक्षणिक संस्थेकडील उपलब्ध असलेल्या संस्थेच्या निवडणूकीसंदर्भातील कागदपत्रांवरुन त्यांना व्यवस्थापनाच्या नियामक मंडळाचा / व्यवस्थापन समितीचा एकूण .......... वर्षांचा अनुभव आहे. तसेच ..................... या संस्थेचे ................... महाविद्यालय नॅक/एम.बी.ए. कडून मूल्यांकन झालेले असून त्याचा वैध कालावधी समाप्त झालेला नाही.

सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांच्या विनंती अर्ज व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीच्या कामी देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

ठिकाण :

**अध्यक्ष / सचिव**

दिनांक :

**संस्थेचे नाव व शिक्का**

(टिप : **सदरचे प्रमाणपत्र हे संबंधित शैक्षणिक संस्थेच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.**)

**(परिशिष्ट - ५)**

**महाविद्यालयीन /मान्यताप्राप्त परिसंस्थेचे अध्यापक यांचेकरिता**

## अध्यापनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./डॉ. ....................................... हे पीएच.डी. धारक असून ................................ या संलग्न महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्थेत पूर्णवेळ विद्यापीठ मान्यताप्राप्त ........................... या पदावर दिनांक ................ पासून आजतागायत कार्यरत आहेत व त्यांचा सेवानिवृत्तीचा दिनांक ............ आहे. त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना संलग्न महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्थेत एकूण .......... वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे.

सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांच्या विनंती अर्ज व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीच्या कामी देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

ठिकाण : **प्राचार्य / संचालक**

दिनांक : **संस्थेचे नाव व शिक्का**

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांनी त्यांच्या संलग्न महाविद्यालयाच्या / मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**

**(परिशिष्ट - ६)**

**महाविद्यालयीन प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे संचालक यांचेकरिता**

## अध्यापनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./डॉ. ...................................... हे पीएच.डी. धारक आहेत/प्राचार्य म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २००० पूर्वी नियुक्त झालेले आहेत व ............................... या संलग्न महाविद्यालयात प्राचार्य / मान्यताप्राप्त परिसंस्थेत संचालक या विद्यापीठ मान्यताप्राप्त पदावर दिनांक ............... पासून आजतागायत कार्यरत आहेत व त्यांचा सेवानिवृत्तीचा दिनांक ............ आहे. त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना संलग्न महाविद्यालयात / मान्यताप्राप्त परिसंस्थेत एकूण ......... वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे. तसेच ..................... या संस्थेचे ................... महाविद्यालय नॅक/एम.बी.ए. कडून मूल्यांकन झालेले असून त्याचा वैध कालावधी समाप्त झालेला नाही.

सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांच्या विनंती अर्ज व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीच्या कामी देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

ठिकाण :

**अध्यक्ष / सचिव**

दिनांक :

**संस्थेचे नाव व शिक्का**

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे संबंधित शैक्षणिक संस्थेच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**

(परिशिष्ट - ७)

**विद्यापीठ विभागातील अध्यापक यांचेकरिता**

## अध्यापनाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, श्री./सौ./डॉ. ........................................ हे पीएच.डी. धारक असून ................................ या विद्यापीठ विभागात ........................... या पदावर दिनांक ............... पासून आजतागायत कार्यरत आहेत व त्यांचा सेवानिवृत्तीचा दिनांक ............ आहे. त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन त्यांना विद्यापीठातील विभागात अध्यापनाचा एकूण ......... वर्षांचा अनुभव आहे.

सदरचे प्रमाणपत्र हे संबंधितांच्या विनंती अर्ज व त्यास जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे निर्गमित करण्यात येत आहे. सदरचे प्रमाणपत्र महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध प्राधिकरणांच्या निवडणुकीच्या कामी देण्यात येत आहे.

स्वाक्षरी

ठिकाण :

कुलसचिव

दिनांक :

**(टिप : सदरचे प्रमाणपत्र हे विद्यापीठाच्या लेटरहेडवर स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिनांकासह निर्गमित करावे.)**